दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com





आता डिजिटल स्वरुपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com



▶ वर्ष-२ ■ अंक-१६ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २१ नोव्हेंबर २०२२ ■ पाने-८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## दिवा न्यूज विशेष संपादकीय

## ठाण्यातला राडा हिंदुत्वासाठी की सत्ता आणि वर्चस्वासाठी?

ठाण्यात मागच्या आठवड्यात शिवसेनेच्या दोन गटात राडा झाला.हा राडा इतका भयानक होता की यात काही वेळासाठी का होईना पोलिसांना अक्षरशः वेठीस धरले गेले.पोलीस स्थानकाबाहेर मोठ्या संख्येने जमाव जमवला गेला.पोलीस स्थानक परिसरात वातावरण गंभीर झालं.बरं ज्या दोन गटात हा राडा झाला ते दोन्ही गट साधारण सात महिन्यांपूर्वी शिवसेना या हिंदुत्ववादी विचारांच्या पक्षाचे कार्यकर्ते!...जे त्यावेळी एकाच पक्षाचे होते, ते आज त्यांच्यात हिंदुत्ववादावरून मतभेद झाल्याने दोन गटात विभागले गेले आहेत. म्हणजे दोन हिंदुत्ववादी संघटना एकमेकांना भिडल्या असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.प्रश्न या ठिकाणी निर्माण होतो,हा राडा हिंदुत्वासाठी होता की सत्ता आणि वर्चस्वासाठी?

राड्यात जखमी झालेले...राड्याचे आरोप असणारे,एकमेकांच्या अंगावर धावून जाणारे आणि गुन्हे दाखल झालेले सर्वच तर हिंदुत्ववादी होते.काही महिन्यांपूर्वी हिंदुत्ववादी संघटनेत एकाच ठिकाणी काम करणारे हे कार्यकर्ते असताना हा राडा हिंदुत्वासाठी आहे असं कसं म्हणता येईल?दुर्दैवाने लोकशाही व्यवस्थेत ठाण्यासारख्या स्मार्ट सिटी होऊ पाहणाऱ्या शहरात राडेबाज राजकीय संस्कृती असणं आणि तिला खतपाणी घालणारी प्रवृत्ती पुढे येणे हे भूषण नक्कीच नाही.सुशिक्षित म्हणवू पाहणाऱ्या वर्गाने याचा विचार करायलाच हवा.आपण कोणत्या जमान्यात वावरत आहोत हे तपासून पहायला हवं.लोकशाहीत वेगळे विचार,मतभिन्नता, वेगवेगळ्या संघटना आणि त्यांचे वेगवेगळे कार्यक्रम होणे चुकीचे मानले जात नाही.प्रत्येकाला आपला पक्ष संघटना वाढविण्याचा अधिकार येथे आहे.असे असताना हा इलाका आमचाच आहे ,असं सत्तरीच्या दशकातील चित्रपटात दाखवल्या जाणाऱ्या व्हिलन प्रमाणे वागणं हे आधुनिक लोकशाहीत अपेक्षित नाही.बरं वाईट,योग्य अयोग्य याचा विचार करून मतदान करण्याची निर्णय क्षमता आजच्या मतदारांमध्ये आहे.त्यामुळे दडपशाही, राडा संस्कृती याचा विरोध आता समाजानेच करायला हवा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. लोकांनीच अशा राडेबाज संस्कृतीचा विरोध केल्यास स्वच्छ राजकारण समोर येईल.

ठाण्यात झालेला राजकीय राडा आणि तशा घटनांचे कोणत्याही परिस्थितीत समर्थन होणार नाही, करताही कामा नये.पोलिसांनी असे प्रकार पुन्हा होणार नाहीत याची खबरदारी घ्यायला हवी.लोकशाही व्यवस्थेला आव्हान देऊ पाहणाऱ्या घटना वेळीच रोखायला हव्यात. कोणत्याही राजकीय पक्षांनी राडेबाजी करून सामान्य जनतेला वेठीस धरण्याचा प्रयत्न केला तर पोलिसांनी त्यांच्यावर कठोर कारवाई करायला हवी. सामान्य नागरिक ज्यावेळी अशी कृती करतात तेव्हा त्यांना ज्या पद्धतीने पोलीस हाताळतात त्याच पद्धतीने राजकीय पक्षांना हाताळले आणि त्यांच्या व्हीआयपी ट्रीटमेंट बंद केल्या तर त्यांना कायद्याचा वचक बसेल.लोकशाहीत राजा असणाऱ्या सामान्य माणसाला मोकळेपणाने आपल्या भूमिका मांडण्याची संधी उपलब्ध व्हावी असे या व्यवस्थेला वाटत असेल तर भयमुक्त आणि समृद्ध राजकारण आजच्या काळाची गरज बनले आहे.स्मार्ट होऊ पाहणाऱ्या ठाण्यासारख्या शहरातील नागरिकांनी ते अधिक जबाबदारीने समजून घ्यायला हवे.

# दिवा शहराला मध्यवर्ती बस स्टॉपची गरज

## ठाणे महापालिका प्रशासन अशा नागरी सुविधांकडे कधी लक्ष देणार?

**दिवा –** दिवा शहरातून ठाणे, नवी मुंबई, डोंबिवली भागात जाण्यासाठी बस सेवा उपलब्ध व्हावी ही अनेक वर्षांची नागरिकांची मागणी कोरोना काळात पूर्ण झाली.कोरोना काळात रेल्वे सेवा सामान्य नागरिकांना बंद झाल्याने दिव्यातून बस सेवा सुरू झाली.त्याआधी आताच्या मार्गावर दिव्यातून बसेस सुरू नव्हत्या.

**दिवा न्यूज रोख ठोक**

आज दिव्यातून वाशी,ठाणे मार्गावर चालणाऱ्या बसेसना प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. दिवा शहरातून पनवेल मार्गावर बस सुविधा उपलब्ध झाल्यास त्याचाही फायदा नागरिकांना होईल.

मात्र असे असले तरी दिवा शहरात मध्यवर्ती बस स्टॉप नसल्याने प्रवासी आणि परिवहन विभागाला याचा त्रास होत आहे.शहरात सध्या दिवा टर्निंग येथे बस वळवल्या जातात.या बस वळवण्यासाठी येथे पुरेशी जागा उपलब्ध नाही.शिवाय भर चौकात या बसेस फिरवल्या जात असल्याने येथे कायम वाहतूक कोंडी होते.शहराचे नियोजन करणाऱ्या दिवा प्रभाग समिती मधील अधिकाऱ्यांना हा गंभीर प्रश्न आजतागायत दिसला नाही याचे आश्चर्य वाटते.वाहतूक विभाग देखील नागरिकांच्या सोयीचा पर्याय काढण्यात अद्याप अपयशी ठरला आहे.

दिव्यात जागेची असणारी कमतरता लक्षात घेऊन वाहतूक व्यवस्थेचे नियोजन होणे गरजेचे आहे. तसे पर्याय पालिका आणि वाहतूक विभाग यांनी शोधायला हवेत.बस थांबा हा ट्रॅफिक होणार नाही अशा ठिकाणी असायला हवा.तो मुख्य गर्दीच्या ठिकाणी असल्याने नागरिक,बसचालक आणि प्रवाशी या सर्वांना मनस्ताप होतो.दिवा शहरातील सध्याची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आणि भविष्याचा विचार करून दिव्यात मध्यवर्ती बस स्टॉप असणे गरजेचे झाले आहे.पालिका प्रशासनाने यावर तोडगा काढायला हवा.दिवा टर्निंगच्या आधी रस्त्याच्या एका बाजूला खासगी बसेस मोठ्या संख्येने उभ्या असतात या भागात सध्या बस थांबा उपलब्ध झाल्यास तो नागरिक आणि वाहनचालक यांच्या सोयीचा होईल.तशी चाचपणी पालिकेने करायला हवी. दिवा टर्निंग येथे सध्या बस वळतात,तिथेच रिक्षा चालक प्रवाशी भरतात आणि तिथेच तिन्ही बाजूने एकाच वेळी वाहने येतात.मुख्य चौक असल्याने येथे वाहतूक कोंडी निर्माण होते. हे टाळण्यासाठी दिवा शहरात परिवहन विभागाचा मध्यवर्ती बस स्टॉप असणे गरजेचे झाले आहे याची जाणीव पालिका प्रशासन व वाहतूक विभाग होणे आवश्यक आहे. ही जाणीव लवकरच होईल आणि दिव्यातील जनतेला सुसज्ज मध्यवर्ती बस स्टॉप मिळेल अशी अपेक्षा करायला हरकत नाही!


दिशादर्शक, मार्गदर्शक!

**दिवा न्यूज** आयोजित

दिवा शहरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी

दिवा शहर मर्यादित

**चित्रकला स्पर्धा २०२२**

**प्रवेश निःशुल्क**

- ही चित्रकला स्पर्धा दोन गटांत असेल.
- दिवा शहर व दिवा प्रभाग समिती हद्दीतील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे.
- भाग घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना दिवा न्यूजचे स्पर्धा प्रमाणपत्र आणि विजेत्यांना आकर्षक बक्षिसे!

गट–अ : इयत्ता पहिली ते चौथी
गट–ब : इयत्ता पाचवी ते नववी

विषय : १) **निसर्ग चित्र**
२) **स्मरण चित्र**
३) **माझे शहर** (संकल्प चित्र)

दिव्यातील विद्यार्थ्यांनी व पालकांनी अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर किंवा क्रमांकावर संपर्क करा

गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंट मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-६१२.

मो. +९१ ९०२९७ ५७०९१

**स्पर्धेचे नियम**

- आर्ट वर्क –A4 किंवा A3 आकारात असावे.
- चित्र कोणत्याही कोऱ्या कागदावर काढता येईल.
- चित्रासाठी कोणतेही माध्यम वापरता येईल.उदाहरणार्थ, जलरंग, ॲक्रेलिक, क्रेऑन चारकोल, रंगीत पेन्सिल, तैलरंग, स्केचपेन इत्यादी.
- चित्र प्रत्यक्ष किंवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवू शकता. पाकिटावर किंवा व्हाट्सअप मेसेज करताना चित्रकला स्पर्धेसाठी असा उल्लेख असावा.
- चित्र तुम्हाला सुचलेले आणि स्वतंत्र असावे.

उत्कृष्ट चित्रांना दिशादर्शक, मार्गदर्शक! **दिवा न्यूज** च्या अंकामधून प्रसिद्धी दिली जाईल.

चित्रासोबत तुमचे पूर्ण नाव, पत्ता, इयत्ता, संपर्क क्रमांक लिहावा!

चित्र पाठवण्याची अंतिम तारीख २१ डिसेंबर २०२२

परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील!
– संपादक,दिवा न्यूज




# ठाणे भूषण डॉ.मधुसूदन खांबेटे यांचे ९२ व्या वर्षी निधन

## लघु उद्योगाचे भीष्म पितामह म्हणून ओळख




**ठाणे :** टिसा व कोसिआचे संस्थापक,अध्यक्ष मधुसूदन उर्फ आप्पासाहेब खांबेटे यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी ठाण्यातील राहत्या घरी शुक्रवारी सकाळी ११. ३० च्या सुमारास वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन नातवंडे, नात सुना, जावई असा परिवार आहे. त्यांची पार्थिव उद्या म्हणजे शनिवारी टीसा हाऊस रोड नं. १६ वागळे इस्टेट येथे अंतिम दर्शनासाठी ठेवले जाणार आहे. तर ते लघु उद्योगांचे मार्गदर्शक तसेच भीष्म पितामह म्हणून ही परिचित आहेत. कोसिआच्या माध्यमातून चीन व सेनेगल येथे उद्योजकांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व देखील त्यांनी केले. तसेच त्यांना ठाणे महापालिकेने ठाणे भुषण पुरस्कार देत, सन्मानित करण्यात आले.

डॉ. खांबेटे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील अंजर्ले या गावात स्वांतत्र्यापूर्वी झाला. ते तीन महिन्यांचे असतानाच ते कोलकता येथे गेले. त्यानंतर त्यांचे सुरवातीचे शिक्षण गुजराती माध्यमाच्या शाळेत झाले. १९३८ ते १९४२ दरम्यान त्यांचे शिक्षण झाले. त्यामुळे त्यांना मराठी, इंग्रजी, हिंदी व गुजराती देखील येत होती. १९४८ मध्ये स्वांतत्र्यानंतर नागपुरात त्यांनी मॅट्रीक पूर्ण केले. त्यानंतर ते मुंबईला आले व पुढील इंटरमीडीएट सायन्स पर्यत शिक्षण पूर्ण केले. ते केवळ एक खेळाडूच नव्हते तर त्यांनी आपल्या शाळेच्या हॉकी, फुटबॉल आणि खो – खो संघाचे नेतृत्व देखील केले होते. दरम्यान त्यांनी पुढील एरोनॉटील इंजिनिअरींगचे शिक्षण घेण्यासाठी कोलकत्ता येथे जाणार होते. परंतु, सरकारने एरलाईन उद्योग ताब्यात घेतल्याचे जाहीर केले. त्यामुळे पुढे कोर्सला पुढे जाण्यात अर्थ नसल्याचे सांगितले. त्याचवेळेस त्यांना मे. वेस्टींगहाऊस सॅक्सबी अँड फार्मरमध्ये ब्रेक मिळाला. त्यावेळेस शिक्षण आणि काम त्यांनी एकत्रच सुरु केले. त्यानंतर ते इंग्लडला सुध्दा गेले. मात्र त्यांच्यातील खरा उद्योजक हा कोलकत्ता येथे घडला. त्यानंतर ते आपल्या कुटुंबासह ठाण्यात स्थायीक झाले. त्यानंतर त्यांनी रेल्वेला काही सुटय़ा भागांचा पुरवठा आणि देखभाल करण्याचे काम चालू ठेवले. याच काळात त्यांनी वागळे इस्टेट भागात दिड लाख व १५ हजार उसनवार घेऊन ५०० चौरस मीटरचा भुखंड खरेदी केला. याठिकाणी वडीलांच्या नावाने त्यांनी कंपनी सुरु केली. ते स्वत: या कंपनीत १६ ते १८ तास राबत होते.

### लघुउद्योजकांचा नंदादीप विझला

**टीसा'चे आधारस्तंभ आप्पासाहेब खांबेटे यांच्या निधनाने लघुउद्योजकांचा नंदादीप विझला. वागळे इस्टेट येथील औद्योगिक वसाहतीतील लघुउद्योजकांचे प्रश्न मांडण्यासाठी ते अखंड कार्यरत होते. त्यांच्या निधनाने उद्योग व सामाजिक चळवळीतील एक तळमळीचे सच्चे व्यक्तिमत्व हरपले. त्यांचे संपूर्ण जीवन हे आदर्श प्रेरणावत होते.**

**– निरंजन डावखरे,**
**आमदार, भाजपा**

### पितृतुल्य व्यक्तीमत्व हरवले

**डॉ. खांबेटे यांचे निधन हि खरोखरच धक्कादायक बातमी. त्यांची ओळख म्हणजे ठाणे येथील टिसा या संस्थेच्या माध्यमातून उद्योग सेवा हेच सर्वस्व. आशावाद ठेवणारे व तळमळीने लघु उद्योगांना मदत करणारे पितृतुल्य व्यक्तीमत्व हरवले. खरोखर एका मार्गदर्शकाला आम्ही उद्योजक मुकलो आहोत.**

**–प्रदीप पेशकार, प्रदेश अध्यक्ष,**
**भाजपा उद्योग आघाडी**

लघु उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी १९७४ साली टिसाची स्थापना केली. त्यानंतर जानेवारी २०२२ पर्यंत ते या संस्थेचे अध्यक्ष होते. जिल्ह्यात लुघ उद्योग वाढविण्याबरोबर रोजगार निर्मितासाठी तसेच ठाण्याच्या विकासासाठी टीसाचे योगदान महत्वाचे ठरले आहे. त्यानंतर जिल्ह्यातील अथवा महाराष्ट्रातील उद्योगासाठी काम करतांना लघु उद्योगांचे प्रश्न राष्ट्रीय स्तरावरील अडचणी येत होत्या. यातूनच चेम्बर ऑफ स्मॉल इंडस्ट्री असोसिएशनची स्थापना झाली त्याचेही अध्यक्ष होते. २०१४ मध्ये त्यांनी पिअरलेसेसचा ॲटक येऊन गेला. मात्र अवघ्या सहा महिन्याते ते पुन्हा जीना चढू उतरु लागले होते. परंतु काही दिवसांपूर्वी ते घरात पडले आणि त्यांच्या पायाला दुखापत झाली. तेव्हापासून ते आजारी असताना शुक्रवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# ठाण्यातील धवल छाया बंगल्याला आग

## अडकल्यांना सुखरूप काढले बाहेर

**ठाणे:** येथील राम मारुती रोड, राजवंत ज्वेलर्सच्या पुढे, येथे धवल छाया या बंगल्याच्या दुसऱ्या मजल्यावर गुरुवारी दुपारी पावणेपाच वाजण्याच्या सुमारास आग लागली. यावेळी अडकलेल्या बंगल्याचे मालक वीर धवल घाग (६८) यांना सुखरूपरित्या बाहेर काढण्यात यश आले. तसेच आग नियंत्रणात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

राम मारुती रोड वर वीर धवल घाग यांच्या मालकीचा तळ अधिक दोन मजली बंगला आहे. याच बंगल्याच्या दुसऱ्या मजल्यावर आग लागल्याची माहिती मिळताच, घटनास्थळी नौपाडा पोलीस, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी व कर्मचारी व अग्निशमन दलाचे अधिकारी व जवान ०३ फायर वाहन व १ रेस्क्यू वाहनासह दाखल झाले. तसेच बंगल्याचे मालक हे अडकले असल्याचे समजताच, अग्निशमन दलाच्या जवानांनी व आपत्ती व्यवस्थापन कर्मचाऱ्यांनी त्यांना सुखरूप बाहेर काढले. तसेच ही आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केल्यावर ती आग नियंत्रणात आली असून यामध्ये कोणाला ही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# महापुरुषांची बदनामी केल्याप्रकरणी ठाण्यात राहुल गांधी यांच्यावर गुन्हा दाखल

**ठाणे :** राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान स्वातंत्र्यवीर सावरकर यांची बदनामी करणारे वक्तव्य केले असून त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.

याविरोधात बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख वंदना सुहास डोंगरे यांनी ठाणे नगर पोलीस स्थानकात राहुल गांधी यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.महाराष्ट्राच्या मातीमध्ये आमच्या महापुरुषांची

### शिंदे गटाच्या महिला आघाडीने केली तक्रार

बदनामी सहन करणार नाही असा पवित्रा वंदना डोंगरे यांनी घेतला असून बाळासाहेबांची शिवसेना पक्षाने देखील यासाठी त्यांना पूर्ण पाठिंबा दिला आहे.

राहुल गांधी यांच्या या अवमानकारक वक्तव्याचा निषेध करण्यासाठी गुरुवारी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाने ठाण्यात निषेध मोर्चाही काढला होता..

पोलिसांनी राहूल गांधी यांच्या या वक्तव्याबद्दल त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी अशी मागणी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रवक्ते आणि महाराष्ट्र राज्य समन्वयक नरेश म्हस्के यांनीही त्या मोर्चा दरम्यान केली होती. त्यानंतर संध्याकाळी हा गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत पोलीस नक्की काय भूमिका घेतात याकडे आता लक्ष लागले आहे.

### ठाण्यात राहुल गांधींविरोधात निदर्शने

**स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबाबत अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या विरोधात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी गडकरी रंगायतन येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकासमोर जोडे मारो आंदोलन केले. यावेळी राहुल गांधीच्या बॅनरला काळे फासण्यात आले.**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, २१ नोव्हेंबर २०२२




# अखेर दिव्यातील रेल्वे तिकीट घरासमोर मोकळ्या जागेत छत उभारणीला सुरुवात

**ठाणे:** दिवा स्थानकातून मुंबई, कर्जत-कसारा, पनवेल, वसई कोकण च्या दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या प्रचंड आहे, शिवाय दिव्यातील बहुतांशी वर्ग हा रेल्वे सेवेवर अवलंबून आहे. दिवा रेल्वे स्थानकात एकमेव तिकीटघर असल्यामुळे त्या तिकीट घरासमोर तिकीट काढण्यासाठी लांबच रांगा लागतात. अपुऱ्या जागेमुळे प्रवाशांच्या रांगा तिकीट घराबाहेर असणाऱ्या मोकळ्या जागेत जातात. तिकीट घराबाहेर छताची कोणतीही सुविधा नसल्यामुळे प्रवाशांना उन्हात-पावसात उभं राहावे लागत होते. त्यातून आता सुटका झाली असून त्या मोकळ्या जागेत छताचे काम रेल्वे प्रशासनाने हाती घेतले असून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि दिवा रेल्वे प्रवासी संघटनेच्या प्रयत्नांना यश आल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष अँड. आदेश भगत यांनी दिली.

# दिवा शहरात शासकीय योजना राबविणाऱ्या ज्योती पाटील यांचे नागरिकांकडून कौतुक

**दिवा:**-पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी अंतर्गत बेरोजगार आर्थिक सहायता शिबिराचे आयोजन भारतीय जनता परतीच्या दिवा शहर महिला मंडळ अध्यक्षा सौ ज्योती राजकांत पाटील यांच्या वतीने करण्यात आले होते. सोमवारी ज्योती पाटील यांच्या कार्यालयाजवळ दिवा शहर मंडळ अध्यक्ष रोहिदास मुंडे यांच्या नेतृत्वाखाली या शिबिराचे आयोजन महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांच्या वतीने करण्यात आले होते.या शिबिराचा लाभ शहरातील अनेक नागरिकांनी घेतला.ज्योती पाटील या शासकीय लाभ मिळवून देणाऱ्या योजना राबवत असल्याने नागरिकांनी त्यांचे कौतुक केले.





**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिना निमित्त शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे दिवा शहर उपशहर प्रमुख सचिन राम पाटील यांच्या वतीने ठा. म. पा. शाळा क्रमांक ८० येथे शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी माजी नगरसेविका अंकिता विजय पाटील , प्रियांका सावंत , अभिषेक ठाकूर , चेतन पाटील, मचिंद्र लाड, स्मिता जाधव, ओकेश भगत, प्रतिक म्हात्रे, विनया कदम , जयंत साळुंखे ,तुषार देशमुख, लक्ष्मण लाड, आकाश शुक्ला, सुनिल फाळके, विजय सावंत उपस्थित होते.**

# जिल्ह्यातील नद्या पुनरुज्जीवत करण्यासाठी रोड मॅप तयार करा

## जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश



**ठाणे: जिल्ह्यातील नद्या वाहत्या राहण्यासाठी तसेच प्रदुषण विरहित करण्यासाठी काय काय उपाय योजना करता येईल यासंदर्भात 'चला जाणूया नदीला' अभियानाअंतर्गत रोड मॅप तयार करावा. तसेच सर्व विभागांनी यासंदर्भात पुढील बैठकीत कृती आराखड्याचे सादरीकरण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी शुक्रवारी ठाण्यात दिले.**

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त राबविण्यात येत असलेल्या 'चला जाणूया नदीला' या अभियानाची जिल्हास्तरीय पहिली बैठक जिल्हाधिकारी शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी समितीचे सहअध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, उपवनसंरक्षक तथा समितीचे सदस्य सचिव संतोष सस्ते, सदस्य उपजिल्हाधिकारी गोपीनाथ ठोंबरे, उपविभागीय अधिकारी बाळासाहेब वाकचौरे, सहायक वनसंरक्षक गिरिजा देसाई, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे डी.एम. कोकाटे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक छाया सिसोदे, अभियानाच्या समन्वयक स्नेहल दोंदे, वसुंधरा मंडळाचे संस्थापक अनंत भागवत यांच्यासह नदी पुनरुज्जीवन क्षेत्रात काम करणारे विविध सदस्य यावेळी उपस्थित होते.

'चला जाणूया नदीला' या अभियानामध्ये जिल्ह्यातील भातसा, उल्हास, वालधुनी, कुंभेरी, कामवारी, भारंगी, कनकवीरा, चोर नदी, लेणाड नदी या नद्यांचा समावेश असल्याचे जिल्हाधिकारी शिनगारे यांनी सांगितले. या नद्यां पुनरुज्जीवित करण्यासाठी तसेच त्या वाहत्या करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याची गरज आहे. तसेच शास्त्रीय दृष्टिकोनातून काय करता येईल याबाबतही विचार करावा. नद्यांच्या पूररेषा निश्चित करण्यासाठी जलसंपदा विभागाने कार्यवाही करावी. त्या पुररेषातील अतिक्रमणे हटविण्यासाठी कायदेशीर उपाय योजावे लागतील. नद्यांच्या किनाऱ्यावरील उद्योगांकडून होणारे दुषित सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे व दुषित पाण्याचे स्त्रोत बंद करण्यासाठी कडक उपाय योजावेत.

नद्यांच्या जलस्त्रोतांचे बळकटीकरण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी देता येईल का यासंदर्भात नियोजन करावे. पाणीसाठ्याची क्षमता वाढविण्यासाठीही वेगवेगळे उपक्रम राबविण्यात यावेत. प्रदुषणासंबंधी गावातील नागरिकांचे विशेषतः महिलांची जनजागृती करण्यासाठी विशेष लक्ष द्यावे, अशा सूचनाही यावेळी शिनगारे यांनी दिल्या.

जिल्ह्यातील नद्यांच्या संदर्भातील सद्यस्थितीचे सादरीकरण केले व अभियानात कशाप्रकारे काम अपेक्षित आहे याची माहिती अभियानाच्या समन्वयक स्नेहल दोंदे यांनी दिली. नदी स्वच्छतेतून गावाचा विकास करण्याचे ध्येय ठेवून हे अभियान राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तर भागवत यांनी जिल्ह्यातील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी काय करता येईल याबद्दल माहिती दिली.

# सुदृढ, पारदर्शक व बळकट लोकशाहीसाठी तरुणांनी मतदार यादीत नाव नोंदवावे

## – मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे

**ठाणे: मतदार यादीत नाव येण्यासाठी काय करावे लागेल, कोणता फॉर्म भरावा लागेल, अर्ज ऑनलाईन करायचा की ऑफलाईन, मतदार यादीत नावासाठी कोणकोणती कागदपत्रे लागतील, अर्ज कुठे करावा, नाव नोंदणी अर्ज सादर करणे ते ओळखपत्र मिळणे या दरम्यान किती वेळ लागतो, मत दिलेल्या उमेदवाराने त्या मताचा गैरवापर केला तर काय करायचे ... तरुणाईला पडलेल्या अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे शुक्रवारी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे आणि जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडून ठाण्यातील विद्यार्थ्यांनी जाणून घेतल्या. समृद्ध, सुजाण व बळकट आणि पारदर्शक लोकशाही प्रक्रियेसाठी तरुणांनी मतदार यादीत नाव नोंदणी करून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन यावेळी देशपांडे यांनी केले.**




## ठाण्यात मतदार नोंदणीसंदर्भातील शंकांची उत्तरे




### बाराशे विद्यार्थ्यांनी नेले अर्ज

**विशेष पुनरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत जोशी बेडेकर महाविद्यालयात मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या केंद्रातून विद्यार्थ्यांना अर्ज वाटप, नोंदणीसाठी मदत केली जात आहे. या ठिकाणाहून महाविद्यालयातील १२०० विद्यार्थ्यांनी अर्ज नेले असून त्यातील ४०० जणांनी अर्ज सादर केले असल्याची माहिती उपजिल्हानिवडणूक अर्चना पाटील यांनी यावेळी दिली.**

महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी, ठाणे जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय आणि ठाण्यातील के.ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत आयोजित लोकशाही गप्पा – भाग ७ अंतर्गत 'कशी होते मतदार नोंदणी' या परिसंवादात मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे, उपजिल्हानिवडणूक अर्चना कदम, मतदार नोंदणी अधिकारी पवन चांडक, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी अर्चना घोलप, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी संतोषकुमार सेंद्रे आदी या परिसंवादात सहभागी झाले होते. संवादक प्रणय चव्हाण व विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून अभिषेक नेमाणे यांनी मान्यवरांशी संवाद साधला. यावेळी उपविभागीय अधिकारी अविनाश शिंदे, तहसीलदार युवराज बांगर, जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्य सुचित्रा नाईक, उपप्राचार्य श्रीमती टोके, महेश पाटील, संदीप पागे, आठवले आदी उपस्थित होते.

विशेष पुनरीक्षण कार्यक्रम म्हणजे काय, मतदार नोंदणी करणे का आवश्यक आहे, १७ वर्षे पूर्ण झाल्यानंतर आगाऊ मतदार नोंदणी करता येते का अशा अनेक शंकांची उत्तरे यावेळी मान्यवरांनी दिली. महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींनी मतदार नोंदणी जनजागृतीविषयी पथनाट्य सादर केले. महाविद्यालयात उभारलेल्या मतदार नोंदणी केंद्राचे उद्घाटन देशपांडे यांच्या हस्ते झाले.

देशपांडे म्हणाले की, भारताची लोकशाही व्यवस्था ही जगातील मोठी लोकशाही आहे. ही लोकशाही टिकविण्याची व अधिक सुदृढ करण्याची जबाबदारी ही आजच्या तरुण पिढीवर आहे. पारदर्शक निवडणुका हा या लोकशाहीचा गाभा आहे. त्यासाठी मतदार याद्या सदोष असणे आवश्यक आहे. ही यादी निर्दोष, पारदर्शक, परिपूर्ण व अधिक अचूक असावी व कोणीही मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी विशेष पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. वंचित, बेघर, तृतीयपंथीय, महिला, युवक अशा घटकांच्या हातात लोकशाहीच्या नाड्या आहेत. तेच जर या प्रक्रियेच्या बाहेर असतील तर लोकशाही बळकट कशी होणार. म्हणून तरुणांना, वंचित समाजातील घटकांना प्रवाहात आणण्यासाठी हा कार्यक्रम महत्वाचा आहे.

विशेष पुनरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतील दुरुस्ती अशी अनेक कामे करण्यात येत आहेत. या कार्यक्रमाअंतर्गत युवा, बेघर, तृतीयपंथीय, देहविक्रय करणाऱ्या महिला, भटके विमुक्त, वंचित घटकांची मतदार यादीत नोंद करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच मतदार नोंदणीसाठी आलेल्या अर्जांची तपासणीसाठी विशेष यंत्रणा राबविण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले.

सुदृढ व बळकट लोकशाहीसाठी या प्रक्रियेत तरुणांना सामावून घेण्यात येत आहे. महाविद्यालयांमध्ये मतदान नोंदणी केंद्राची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच समाज माध्यमाद्वारे जनजागृती करण्यात येत असून मिम्स, लोकशाहीचा भोंडला असे विविध स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. जास्तीत जास्त युवा वर्गाला मतदार यादीत नाव नोंदणी करता यावी, यासाठी वर्षातून चार वेळा आगाऊ नोंदणी करण्याची सुविधा देण्यात आली आहे. या सुविधेचा लाभ घेऊन १८ वर्ष पूर्ण न झालेल्या तरुणांनाही नाव नोंदविता येणार आहे. मात्र, त्यांच्या नावाचा समावेश १८ पूर्ण झाल्यावर यादीत होणार असल्याचेही देशपांडे यांनी सांगितले.

## राहुल गांधी यांना मिळत असलेले यश भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षांना बगवत नाही

### – सचिन शिंदे यांचा आरोप

**ठाणे :** काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्या दौऱ्याला मिळणारा जनसामान्यांचा प्रतिसाद, पाठींबा यामुळे भाजपसह त्यांचे मित्र पक्ष देखील बिथरलेले आहेत. त्यामुळेच त्यांच्याकडून अशा प्रकारची आंदोलने सुरु आहेत. नाण्याचा दोन बाजू असतात सावरकर इतर स्वातंत्र्य सैनिका प्रमाणे स्वातंत्र्य सैनिक असू शकतात. परंतु राहुल गांधी सांगतात ही नाण्याची दुसरी बाजू असून तिचा इतिहास सुद्धा तितकाच सत्य असल्याचा दावा ठाणे शहर काँग्रेसचे प्रवक्ते तथा सरचिटणीस सचिन शिंदे यांनी केला आहे आंदोलन करणाऱ्या बाळासाहेबांची शिवसेना आणि मनसेला देखील या निमित्ताने सडेतोड उत्तर दिले आहे.

## बीएसयुपी आणि रेंटलच्या घरांचा गैरव्यवहार रोखण्यासाठी पालिकेची जनजागृती

**ठाणे :** ठाणे महापालिकेकडील बीएसयूपी आणि रेंटलची घरे परस्पर विक्री करणे किंवा ती भाड्याने देणे हे प्रकार उघडकीस डायघर, वर्तकनगर आणि चितळसर पतीसरात उघडकीस आले. त्याच्यानंतर घरांच्या विक्रीप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत. अशा भूलथापांना कोणीही बळी पडू नये, किंवा कोणीही आर्थिक व्यवसाय करू नये, याचबरोबर अशा गैरव्यवहाराला वेळीच आळा बसावा यासाठी ठाणे महापालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागाने आता जनजागृती विशेष भर देण्यास सुरू केली आहे. या जनजागृतीबरोबर या विभागाने असे प्रकार घडत असली तर त्याची माहिती महापालिकेच्या तातडीने निदर्शनास आणावी, असे आवाहन केले आहे.

मध्यंतरी ठाणे महापालिका हद्दीत डायघर असेल किंवा वर्तकनगर भागातील पालिकेची रेंटलची घरे तसेच बीएसयुपीची घरे ही महापालिकेची कोणताही परवानगी न घेता, पालिकेच्या अधिकाऱ्यांच्या नावांचा वापर करुन ती पस्पर विकण्यात आली. हा प्रकार उघडकीस आल्यावर त्या विरोधात काही राजकीय पक्षांनी रस्त्यावर उतरत आंदोलने केली. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करा अशी मागणी देखील झाली होती. परंतु डायघर मधील घटनेनंतर एक मोठे रॅकेट या प्रकरणात पालिकेतील अधिकाऱ्यांनी उघडकीस आणले होते. यावेळी डायघर पोलीस ठाण्यात तब्बल तीन गुन्हे देखील करण्यात आले. तसेच चितळसर पोलीस ठाण्याच्या हद्दीत देखील अशाच स्वरुपाचा प्रकार उघडकीस आणला गेला होता. वर्तक नगर भागातील रेंटलच्या घरांच्या बाबतीतही असाच काहीसा प्रकार पुढे आला होता. या प्रकरणातही पालिका अधिकाऱ्यांची खोटी नावे वापरुन घरांची विक्री करणे तसेच बाधीत नागरीकांनी आपली घरे दुसऱ्यांना भाड्याने देण्याचे प्रकार समोर आले होते. या प्रकरणी देखील वर्तक आणि चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.या आणि अशा प्रकारच्या घटना आळा कसा घालायचा असा प्रश्न महापालिकेसमोर असताना, आता महापालिकेच्या स्थावर मालमत्ता विभागाने जनजागृती मोहीम हाती घेत, थेट ठाणेकरांना जाहीर आवाहन केले आहे. त्यानुसार नागरीकांनी तसेच प्रकल्प, रस्ता रुंदीकरण बाधीत नागरीकांनी अशा व्यक्तींच्या भुलथापांना बळी पडू नये असे आवाहन ही संबंधित विभागाचे कार्यालयीन अधीक्षक महेश आहेर यांनी केले आहे.

# शिवसैनिकांवर दाखल केलेले खोटे गुन्हे रद्द करा; खऱ्या गुन्हेगारांना अटक करा

## ठाणे शिवसेना जिल्हा शाखेकडून पोलीस आयुक्तांकडे मागणी

## पोलिसांचा आदर करावा हीच दिघे यांची शिकवण

*गुरुवर्य आनंद दिघे साहेबांनी पोलिसांचा आदर करावा अशी शिकवण आम्हाला दिली. ज्या दिवशी पोलिसांची दहशत संपेल त्या दिवशी आपल्या आई – बहिणींवरती अत्याचार होऊन गुंडाराज येईल. आम्ही शिष्य म्हणून त्याचे अनुकरण करीत आहोत.*

*– खासदार राजन विचारे*



**ठाणे:** किसन नगर येथे घडलेल्या घटनेत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या पक्षाच्या कार्यकर्त्यांवर दाखल करण्यात आलेले गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे रद्द करा आणि सामाजिक शांततेसाठी खऱ्या गुन्हेगारांना अटक करा अशी मागणी ठाणे शिवसेना जिल्हा शाखेच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी ठाणे शहर पोलीस आयुक्त जयजीत सिंग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. तसेच त्यामध्ये या प्रसंगी दंगलीत चिथावणी देणाऱ्या, व आमच्यावर जीवघेणा हल्ला करण्यास जमावास प्रवृत्त करणाऱ्या नरेश म्हस्के, राम रेपाळे, योगेश जाणकर, राहुल लोंढे, विकास रेपाळे, सिद्धू अभंगे, दत्ता फासले यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करून त्यांना सामाजिक शांततेसाठी त्वरित अटक करावी. अशी मागणी केली आहे.

सोमवार १४ नोव्हेंबर २०२२ रोजी रात्री ९:३० वाजता खासदार राजन विचारे व त्यांच्यासोबत असलेले लोकसभा संपर्कप्रमुख मधुकर देशमुख, जिल्हाप्रमुख केदार दिघे, प्रवक्ते चिंतामणी कारखानीस व इतर शिवसेना पदाधिकारी नव्याने नियुक्त झालेले उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांच्या किसन नगर भटवाडी येथील कार्यालयाला भेट देण्यास गेले असताना माजी नगरसेवक योगेश जानकर यांनी व सोबतच्या गुंडांनी शिवसेना पदाधिकारी दीपक साळवी व हेमंत नार्वेकर यांना बेदम बुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी त्यांच्यासोबत १५० ते २०० चा जमाव होता मारहाण करतेवेळी झालेल्या चित्रीकरण कॅमेरे मध्ये बंदिस्त करण्यात आलेले आहे याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी श्रीनगर पोलीस स्टेशनमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित नसल्याने गुन्हा दाखल केला जात नव्हता, या प्रकरणी गुन्हेगारांवर गुन्हा दाखल करण्यासाठी खासदार व त्यांच्यासोबत असलेले सर्व पदाधिकाऱ्यांना पोलीस स्थानकामध्ये ताटकळत बसविण्यात आले होते. असे दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

त्या संपूर्ण घटनेवेळी शिंदे गटाचे नरेश मस्के यांनी कोपरीतून की आणखीन कुठून गुंड बोलविले होते ठाऊक नाही परंतु साधारणता १५०० गुंडांनी श्रीनगर पोलीस स्थानकाबाहेर जमा करून पोलीस स्थानकाला घेरले होते, सर्व गुंड हत्यारा सहित पोलीस स्थानकाच्या आवारात दंगल घडविण्यासाठी व आम्हाला शारीरिक इजा करण्याच्या उद्देशाने पोहोचले होते. असाही आरोप निवेदनात केला. त्याचप्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या केबिनमध्ये आम्ही शांत बसलो असताना कोणी दत्ता फासले या नावाचा इसम वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या केबिनमध्ये येऊन. बाहेर येऊन दाखवा तुमचे हात पाय मोडू अशी धमकी देऊन निघून गेला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वारंवार फोन करून या पोलिसांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करीत, त्यावेळी संशयित निर्दशनास येत होते.

या पत्रामध्ये म्हटले की ज्यांनी खरी मारहाण केली त्यांनीच पोलीस आयुक्त कार्यालयात उपस्थित राहून खोटे व प्रभावी गुन्हे दाखल करण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. तसेच पत्रात, बेसावधपणे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या २ कार्यकर्त्यांना मारहाण करतेवेळी हेमंत नार्वे कर याची तीन तोळ्याची चैन गहाळ झाल्याची आम्ही तक्रार केली होती. परंतु या लोकांनी चिंतामणी कारखानीस व मधुकर (अन्ना) देशमुख यांनी चैन खेचली अशी धादांत खोटी तक्रार केलेली आहे असे म्हटले आहे. याशिवाय शिस्तबद्ध श्रीनगर पोलीस स्थानकातून बाहेर निघून जात असताना सराहित गुन्हेगार असलेला सिद्धू अभंगे याने पोलिसांना धक्का – बुक्की करून दीपक साळवी आणि पदाधिकाऱ्यांवर पुन्हा हात उगारल्यानंतर पोलिसांनी त्याच्यासोबत असलेल्या गुंड प्रवृत्तीच्या इसमांवर लाठीचार सुरू केला. याच गुंडांवर झालेल्या लाठीमाराला पोलीस मारहाण करीत असल्याचे दाखवून पोलिसांवर दबाव टाकण्याचे काम नरेश म्हस्के करीत होते. असे म्हटले आहे.

पोलीस प्रशासन ही एक घटनात्मक व्यवस्था आहे. त्यामुळे ती संमत कायद्यानुसारच असायला हवी. अन्यथा महाराष्ट्राचा बिहार व्हायला वेळ लागणार नाही. अशी स्पष्ट प्रतिक्रिया खासदार राजन विचारे व त्यांच्या सोबत असलेले शिष्टमंडळ व धर्मराज पक्षाचे अध्यक्ष राजन राजे यांनी दिली.

# गोवरशी लढण्यासाठी ठामपा सज्ज

## लस आणि औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध

## शिळ आणि कौसा सापडले बाधित रुग्ण

*सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, बालकांचे गोवर लसीकरण झाले नसेल तर ते तत्काळ करून घ्यावे. लसीकरणाची व्यवस्था सर्व नागरी आरोग्य केंद्रे, छत्रपती शिवाजी रुग्णालय येथे सुरू आहे. तसेच, गोवरची लक्षणे आढळली तर ताबडतोब आरोग्य केंद्रात या. उपचारांनी गोवर बरा होतो. मात्र त्यात विलंब झाला तर धोक्याचे ठरू शकते.*

*– अभिजीत बांगर*

**ठाणे :** ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील शिळ आणि कौसा या नागरी आरोग्य केंद्रांच्या अंतर्गत 'गोवर' या आजाराचे ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात, कौसा येथे ५, शीळ येथे ४, मुंब्रा येथे २, एन एम गल्लीत २ असे गोवर बाधित सापडले आहेत. त्यामुळे या दोन्ही आरोग्य केंद्रांच्या हद्दीत २४ तास आणि सातही दिवस घरोघरी जाऊन व्यापक सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यासाठी, अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे, अशी माहिती ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली.

गोवरची लक्षणे दिसू लागल्यापासून तो बरा होईपर्यंत दहा दिवसांचा कालावधी जातो. त्यामुळे, शिळ आणि कौसा आरोग्य केंद्रात पाच दिवसात सर्वेक्षण पूर्ण करून, दुसरी फेरी लगेच पुढील पाच दिवसात पूर्ण करावी. जेणेकरून सर्व संशयित बालके शोधून उपचार करणे शक्य होईल आणि संसर्गाची साखळी तोडणे शक्य होईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. अजूनही ज्या बालकांनी लस घेतली नसेल त्यांचे पालकांनी त्यांना लसीकरण करून घ्यावे. लस घेतलेल्या बालकांना गोवर होत नाही. झालाच तर कोणत्याही धोक्याशिवाय बालक बरे होते. म्हणून लसीकरण आवश्यक असल्याचा पुनरुच्चार आयुक्त बांगर यांनी केला.

स्थानिक भागात काम करणारे सर्व खाजगी डॉक्टर आणि नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी यांचा व्हॉट्सप ग्रुप बनविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित डॉक्टरांनी त्यांच्याकडे उपचारासाठी आलेल्या गोवर सदृश लक्षणे असणाऱ्या रुग्णाच्या नातेवाईकांचा नंबर नोंदवून तो तत्काळ व्हॉट्सप ग्रुपवर देणे बंधनकारक आहे. याच ग्रूपवर उपचार, औषधे याबद्दल मार्गदर्शन केले जाईल, असे बांगर यांनी नमूद केले.

### विलगीकरण कक्ष

ठामपाच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे विलगीकरण कक्ष सुरू करण्यात आला आहे. आवश्यकता भासल्यास पार्किंग प्लाझा येथेही विलगीकरण कक्ष तयार आहे. तसेच, तेथे बालकांसाठी अती दक्षता कक्ष ही उपलब्ध आहे.

### गतिमान लसीकरण

लसीकरण वाढवणे, फिरते लसीकरण पथक तैनात करणे, ठाणे महापालिका क्षेत्रातील अंगणवाड्या, बालवाड्या येथील मुलांचे गोवर आणि रुबेला लसीकरण गतिमान करणे आदी विषयांवर अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांच्याकडेही बैठक झाली. त्यास उपायुक्त मनीष जोशी,आरोग्य केंद्रांच्या समन्वयक डॉ. राणी शिंदे आदी अधिकारी उपस्थित होते.

### खाटा, औषधे यांची कमतरता नाही

खाटा, औषधोपचार यांची कोणतीही कमतरता भासणार याची काळजी घेतली जात आहे. सर्वे क्षणाचे काम २४ तास आणि सातही दिवस सुरू राहील. नागरिकांना गोवरसदृश्य लक्षणे आढळल्यास त्यांनी घरगुती उपाय करण्यात वेळ न घालविता तात्काळ ठाणे पालिकेच्या नजीकच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

# तायक्वांदो स्पर्धेत दापोलीतील तायक्वांदो स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या खेळाडूंचे सुयश

**दापोली:–** तालुकास्तरीय शालेय स्पर्धा ए.जी. हायस्कूल दापोली येथे १५ नोव्हेंबर रोजी पार पडल्या. या स्पर्धेत तायक्वांदो स्पोर्ट्स फाऊंडेशन दापोली या संस्थेचे खेळाडू शाल्मली माने,मृणाली तांबे,स्वराली दळवी,ऋतुराज ईदाते,वेदांत ईदाते या खेळाडूंनी सुवर्ण पदक जिंकले. तसेच सार्थक साखळकर व युवराज शिगवण ह्याने कांस्य पदक जिंकले. व दिव्यांशू माने याने सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केलेल्या खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेत निवड झाली आहे.या खेळाडूंनी तायक्वांदो स्पोर्ट्स अकादमी ऑफ दापोलीचे नावलौकिक केले आहे.या यशाबद्दल तायक्वांदो स्पोर्ट्स अकादमी ऑफ दापोलीचे सर्व पदाधिकारी स्वप्नील येलवे(अध्यक्ष),संकेत जालगावकर(उपाध्यक्ष),गणेश पवार(सचिव) अनिकेत पाथे (खजिनदार),विशाल चौगुले व राघव पटेल (सदस्य) या सर्व मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच तायक्वांदो स्पोर्ट्स फाऊंडेशन दापोली संस्थेच्या प्रमुख प्रशिक्षक तसेच सचिव प्राजक्ता अरुण माने मॅडम(ब्लॅक बेल्ट व राष्ट्रीय पंच महाराष्ट्र) ह्यांनी सर्व खेळाडूंना लाखमोलाचे सहकार्य केले. त्या सोबत सिनियर खेळाडू सौ. शिल्पा साखळकर मॅडम व शालिनी भुवड मॅडम ह्यांनी सहप्रशिक्षक म्हणून सर्व खेळाडूंना महत्त्वाचे मार्गदर्शन केले. ह्या स्पर्धेत ए.जी हायस्कूल दापोलीच्या सौ.देशमुख मॅडम ह्यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. दापोली तालुक्यातील सर्व शाळेतील क्रीडा शिक्षक, पालक,विद्यार्थी व अनेक क्रीडाप्रेमी या स्पर्धे दरम्यान उपस्थित होते.स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील राष्ट्रीय पंच कृणाल चव्हाण सर प्रमुख पंच म्हणून कामगिरी केली.त्यांच्या देखरेखीत स्पर्धा संपन्न झाली. विजेत्या सर्व खेळाडूंना पदके देऊन गौरवण्यात आले.



## सिंधुदुर्गातील 'गावपळण'ला सुरुवात, गुराढोरांसह गावकरी तीन दिवस वेशीबाहेर

**सिंधुदुर्ग –** कोकणातील एक अनोखी आणि आगळी वेगळी परंपरा म्हणजे 'गावपळण'. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील चिंदर गावात ही परंपरा सुरू आहे. रवळनाथाच्या कौलाने दर तीन वर्षांनी मोठ्या उत्साहात चिंदर गावची गावपळण ही परंपरा सुरू होते. चिंदर गावात गावपळणीला दुपारनंतर सुरुवात होते. गावकरी गुराढोरांसह तीन दिवस वेशीबाहेर निघाले. तीन दिवसांनी देवाचा कौल घेऊन पुन्हा सर्वांचा गावात प्रवेश होणार आहे.

चिंदर गाव आजच्या विज्ञान युगातही गावपळण परंपरा पाळत गावाबाहेर जातं. कुणी खासगी वाहनांसह एसटी, रिक्षा, टेम्पोचा आधार घेत तर कोणी बैलगाडीतून पारंपरिक पद्धतीने गावाबाहेर जातात. दर तीन वर्षांनी होणाऱ्या गावपळणीसाठी त्रिपुरारी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी बारा पाच मानकरी रवळनाथ मंदिरात जमून रवळनाथाला तांदळाचा कौल प्रसाद घेतला जातो. त्यानंतर गावपळणीला सुरुवात होते.

'चिंदर गावची गावपळण करण्यास रवळनाथाची परवानगी आसा काय?', असं सांगणं करून उजवा कौल प्रसाद झाल्यावर बारा पाच मानकरी एकत्र (मेळ्यावर) बसून भटजींना विचारुन तारीख ठरवतात. त्यानंतर गावच्या देवाला कौल लावला जातो. देवाने कौल दिला की गावकरी गाव सोडून वेशीबाहेर राहुट्या उभारून राहतात. तीन दिवस तीन रात्री भजन, फुगड्या खेळत मजेत आनंदाने घालवतात. ६०० वर्षांची ही गावपळण परंपरेनिमित्त देवाच्या कौलाने चिंदर गाव सुट्टीवर गेलं आहे. या गावात पाच ते सात हजार लोकसंख्या आहे. सर्व धर्मीय या परंपरेला मानून गावपळण प्रथेमुळे सुट्टीवर आहे. गावकरी मोठ्या उत्साहाने पूर्ण गाव खाली करत रानावनात वेशीवर झोपड्यांमध्ये राहतात. गावपळणीला काहीजण श्रद्धा म्हणून पाहतात. मात्र चिंदर वासीय गावपळण म्हणजे गावाच्या ग्रामदेवताने दिलेला एक कौल म्हणून मानतात.

## पाऊस परतल्यामुळे वेळास समुद्र किनारी कासवांच्या विणीचा हंगामाला सुरुवात

**मंडणगड –** मोसमी पाऊस वेळेत परतल्यामुळे यंदा कासवांच्या विणीचा हंगाम वेळेत सुरू होईल, असे चित्र दिसत आहे. वेळास (ता. मंडणगड)




समुद्रकिनारी राज्यातील पहिले कासवाचे घरटे आढळून आले आहे. जिल्ह्यात सुमारे १४ किनाऱ्यांवर ऑलिव्ह रिडले कासवांच्या संवर्धनासाठी वनविभागाच्या सहकार्याने पावले उचलण्यात आली आहेत. गतवर्षी विणीचा हंगाम दोन पुढे गेला होता; मात्र यंदा कासव विणीसाठी वेळेत दाखल होणार असल्याने कासवमित्रही सज्ज झाले आहेत.

कोकणातील किनारी भागात ऑलिव्ह रिडले कासवं विणीसाठी येतात. अंडी घालून गेली की, त्याचे योग्यप्रकारे जतन न झाल्यामुळे त्यातून कासवांची पैदास होण्याचा टक्के अत्यल्प होता. वनविभागाच्या कांदळवन कक्षामार्फत कासव संवर्धनासाठी पावले उचलण्यात आली आहेत. त्यानुसार गेल्या काही वर्षात विणीसाठी कासव येत असलेल्या किनाऱ्यांचा शोध घेऊन स्थानिक कासवमित्रांची फौज तयार करण्यात आली आहे. मंडणगडपासून राजापूरपर्यंतच्या किनाऱ्यांवर सुमारे १४ ठिकाणी कासवांचे संवर्धन केले जाते. त्यात वेळास येथे कासव महोत्सवाचेही आयोजन केले जाते. या ठिकाणी कासवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवतात. याला पर्यटनाची जोड मिळाली आहे.गतवर्षी मोसमी पावसाचा मुक्काम लांबला आणि प्रत्येक महिन्यात अवकाळी पाऊस पडत होता. त्यामुळे कासवांचा विणीचा हंगाम पुढे गेला. नोव्हेंबर महिन्यात विणीसाठी येणारी कासवं गतवर्षी जानेवारी, फेब्रुवारीला दाखल झाली. त्यामुळे अंड्यांमधून पिल्ले बाहेर पडण्याचा कालावधीही तेवढाच पुढे गेला. उन्हाळ्यामध्ये अंड्यांचे संरक्षण करण्याचे मोठे आव्हान कासवमित्रांपुढे होते.

## किरदाडी शाळेच्या सार्थक चव्हाणने पटकावला राज्यस्तरीय बाल चित्रकार पुरस्कार

**देवरुख –** संगमेश्वर तालुक्यातील जिल्हा परिषद किरदाडी शाळेचा विद्यार्थी सार्थक मकरंद चव्हाण याने शिक्षक ध्येय च्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय बाल चित्रकार पुरस्कार २०२२ पटकावला आहे.



शिक्षक ध्येय च्या वतीने १४ नोव्हेंबरला बाल दिनाच्या औचित्याने राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण चित्रकलेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा १ली ते ५वी आणि ६वी ते १० वी या दोन गटात घेण्यात आली होती.

या स्पर्धेमधे देवरुख जवळील पूर्ण प्राथमिक मराठी शाळा किरदाडी येथील इयत्ता दुसरीत शिकणारा सार्थक मकरंद चव्हाण याने राज्यस्तरीय बाल चित्रकार पुरस्कार पटकावला आहे. हा पुरस्कार पटकावणारा महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातून सार्थक हा एकमेव विद्यार्थी ठरला.

सार्थक ने यापूर्वी देखील राज्यस्तरावर मंथन परीक्षेमध्ये यश मिळविले आहे. अवघ्या ७ वर्षांच्या चिमुकल्याचे हे यश पाहून त्याचे सर्वत्र कौतूक केले जात आहे. सार्थक याचे शिक्षिका सौ.माळवदे,गावचे सरपंच सुबोध पेडणेकर,पोलिस पाटील निलेश पेडणेकर, कला शिक्षक सुरज मोहिते आणि शिक्षक वर्ग यांसह सर्व ग्रामस्थानी अभिनंदन केले आहे.

## पाचवी, आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

**रत्नागिरी –** इयत्ता पाचवी, आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा पुढील वर्षी दि. १२ फेब्रुवारीला होणार आहे. या संदर्भात परीक्षा परिषदेकडून वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना दि. १५ डिसेंबरपर्यंत त्यांच्या शाळांमार्फत नियमित शुल्क भरून शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अर्ज दाखल करता येणार आहे. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवी, आठवीला प्रवेश घेतलेल्या शासकीय, खाजगी, अनुदानित, विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षा देता येणार आहे. दोन्ही इयत्तांसाठी प्रत्येकी चार पेपर असतील. प्रथम भाषा, गणित, तृतीय भाषा, बुद्धिमत्ता चाचणी अशा चार विषयांची मिळून शिष्यवृत्ती परीक्षा होणार आहे. पेपर क्रमांक एकमध्ये प्रथम भाषेकरिता ५० गुण, गणित विषयात १०० गुण असा एकूण १५० गुणांचा पेपर राहाणार आहे. क्रमांक दोनमध्ये तृतीय भाषेला ५० गुण, बुद्धीमत्ता चाचणीचा पेपर १०० गुणांचा राहाणार आहे.

## भात खरेदी योजनेंतर्गत शेतकरी नोंदणीला ३० नोव्हें.पर्यंत मुदतवाढ

**रत्नागिरी –** लांबलेला पाऊस आणि त्यामुळे कापणीला झालेला उशीर त्यामुळे उद्भवलेल्या तांत्रिक अडचणीमुळे भातखरेदीच्या नोंदणीला शेतकऱ्यांकडून अल्प प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे शेतकरी नोंदणीला मुदतवाढ मिळण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली होती. त्यानुसार भात खरेदी योजनेंतर्गत शेतकरी नोंदणीच्या कालावधीला ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.भात खरेदी योजनेंतर्गत नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांना सन २०२२-२३ या वर्षी पिकपेऱ्यामध्ये भाताची नोंद असलेल्या सातबारा उताऱ्याची आवश्यकता आहे. मात्र, अनेक शेतकऱ्यांनी तशा नोंदी केलेल्या नसल्याने अनेक साताबारा उताऱ्यांवर यावर्षीच्या पिकपेऱ्याची नोंदी झालेल्या दिसत नाहीत. त्यामुळे भात खरेदी योजनेंतर्गत शेतकरी नोंदणीला शासनाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे. शेतामध्ये पिकणारे भात शासनाकडून खरेदी केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतामध्ये पिकणाऱ्या भातातून उत्पन्न मिळते. मात्र, अद्यापही भात कापणी सुरू आहे. पीकपेरा नोंदणी असलेला ऑनलाईन सातबारा उतारा मिळण्यामध्ये येत असलेल्या अडथळ्यांमुळे भातविक्रीसाठी नावनोंदणी करण्याला शेतकऱ्यांकडून अल्प प्रतिसाद मिळाला. त्यामुळे नावनोंदणीसाठी शासनाकडून देण्यात आलेला कालावधीही अपुरा ठरत आहे. शासनाने ३० नोव्हेंबरपर्यंत नावनोंदणीसाठी मुदतवाढ दिली आहे.

## परशुराम वाडी-एरंडेवाडी बावनदी पुलाचे रखडलेले काम सुरू करण्यासाठी नितीन गोताड यांनी घेतली रवींद्र चव्हाण यांची भेट

**मुंबई:–**परशुराम वाडी-एरंडेवाडी-खंडागळे वाडी वाहतूक पुलाच्या रखडलेल्या कामासंदर्भात गाव विकास समितीचे नितीन गोताड यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या पुलाचे काम लवकर सुरू करण्याची मागणी केली. पुलाचे काम गेले काही वर्षे रखडले आहे या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन, यावेळी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी संबंधित अधिकारी यांना फोन करून सदर पुलाचे काम लवकरात लवकर सुरू करण्याचे आदेश दिले.येत्या आठवड्यात या पुलाचे काम सुरू करण्यात येणार असल्याची माहिती संबंधित अधिकारी यांनी दिली.हा पूल लवकरात लवकर व्हावा अशी येथील ग्रामस्थांची मागणी आहे.मंत्री रवींद्र चव्हाण यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेतल्या बद्दल गाव विकास समितीच्या वतीने नितीन गोताड यांनी रवींद्र चव्हाण यांचे आभार मानले आहेत.यावेळी भाजपचे नेते शिवाजी आव्हाड देखील उपस्थित होते.

# पीएम स्वनिधीचे ठाणे शहरासाठी असलेले लक्ष्य पार करू या

## –आयुक्त अभिजीत बांगर यांचे निर्देश

**ठाणे :** पीएम स्वनिधी या फेरीवाला कर्ज योजनेसाठी ठाणे महापालिका क्षेत्राला ११ हजार २३७ अर्जांचे लक्ष्य देण्यात आलेले आहे. ठाण्यासारख्या शहरासाठी हे लक्ष्य मोठे नाही. त्यामुळे सर्व सहाय्यक आयुक्तांनी वैयक्तिक लक्ष घालून हा टप्पा लवकरात लवकर पार करावा, असे निर्देश ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी नुकतेच दिले.

पीएम स्वनिधी ही केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. त्याबाबत मुंबईत केंद्रीय अर्थ राज्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व संबंधितांची बैठक घेऊन उद्दिष्टपूर्ती बद्दल सूचना दिल्या. डिसेंबर महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पीएम स्वनिधीच्या लाभार्थींना १० हजार रुपयांचे वितरण होणार आहे. त्यामुळे ३० नोव्हेंबरपर्यंत नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे.

पीएम स्वनिधी योजनेची प्रगती, त्यातील अडचणी, उपाययोजना यांचा आढावा घेणारी बैठक आयुक्त अभिजीत बांगर यांनी नुकतीच घेतली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त (२) संजय हेरवाडे, उपायुक्त वर्षा दीक्षित, पीएम स्वनिधी योजनेचे ठाण्याचे लीड मॅनेजर श्री. भारती, सर्व सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.

या कर्जासाठी फेरीवाला पात्र ठरला म्हणजे त्याला अधिकृत फेरीवाल्याचा दर्जा प्राप्त होत नाही. कोरोना काळात बसलेल्या आर्थिक फटक्यातून सावरण्यासाठी केंद्र सरकारने आणलेली ही योजना आहे. या योजनेचा उद्देश अतिशय चांगला असून ती जास्तीत जास्त फेरीवाल्यांपर्यंत पोहोचवणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे, हे आपले नैतिक कर्तव्य आहे, असे आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.

अर्ज करण्यात काही अडचणी असतील तर त्यात स्वतः लक्ष घालावे. अर्ज भरण्याचा संपूर्ण प्रक्रियेसाठी फेरीवाल्यांचा एक दिवसापेक्षा जास्त वेळ जाणार नाही, याचीही दक्षता घ्यावी. त्यांना हेलपाटे मारावे लागले तर इतर फेरीवाले या योजनेला प्रतिसाद देणार नाहीत. एक तासात अर्ज भरून घ्यावा, अशा सूचना आयुक्त बांगर यांनी सर्व सहाय्यक आयुक्तांना दिल्या.

'स्वनिधी से समृध्दी तक' या दुसऱ्या टप्प्यात ठाण्याची कामगिरी चांगली आहे. त्याची शिबिरे दर आठवड्याला घेतली जावीत. फेरीवाल्यांना डिसेंबर २०२४ पर्यंत पहिल्या टप्प्यात १० हजार रुपये, दुसऱ्या टप्प्यात ५० हजार रुपये आणि तिसऱ्या टप्प्यात ८० हजार रुपये मिळू शकतील. आताच्या काळात कोणत्याही हमी शिवाय असे कर्ज मिळणे अशक्य आहे. म्हणूनच जास्तीत जास्त फेरीवाल्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही बांगर यांनी केले.

प्रत्येक प्रभाग समितीतून किमान २ हजार अर्ज यावेत. तसेच, यापूर्वी नाकारण्यात आलेल्या अर्जांचाही पुनर्विचार करावा. यापूर्वी बँकांनी मोठ्या प्रमाणावर अर्ज फेटाळले होते. मात्र, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड आणि राज्याचे उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत सूचना दिल्यानंतर बदललेल्या नियमांमुळे आता जुन्या अर्जातील काही जण पात्र ठरू शकतील, असेही बांगर यांनी नमूद केले.

बँकांनी कोणतीही जास्तीची कागदपत्रे, स्टॅम्प पेपर मागू नयेत. महापालिकेकडून कागदपत्रांची पडताळणी करून लेटर ऑफ रेकमेंडशन आले की ते स्वीकारले जावे हे राज्यस्तरीय बँकिंग कमिटीने स्पष्ट केले आहे. त्याचा पुनरुच्चार पीएम स्वनिधी योजनेचे ठाण्याचे लीड मॅनेजर भारती यांनी केला.

*पीएम स्वनिधी योजनेबद्दल महापालिका युद्धपातळीवर काम करते आहे. दररोज लक्ष्याच्या तुलनेत कामगिरीचा आढावा घेतला जातो आहे. यात, काही प्रमाणात बँकांकडून अडथळे येत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे, बँकांनी संवेदनशीलपणे काम करावे. सगळ्यांनी एकत्र येऊन करण्याचा हा उपक्रम आहे. केंद्र सरकारने ठरवून दिलेल्यापेक्षा कोणतीही अधिक कागदपत्रे बँकांनी मागू नयेत. तसेच, फेरीवाल्यांचे शून्य शिल्लक खाते विना अडथळा उघडले जावे.*

*– अभिजीत बांगर, आयुक्त, ठामपा.*

# राष्ट्रीय ज्युनिअर अथलेटिक्स स्पर्धेत ठाण्याच्या इशा नेगीला रौप्यपदक



**ठाणे:** ३७ वी राष्ट्रीय ज्युनियर ऍथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२२ ही स्पर्धा नुकतीच ११ ते १५ नोव्हेंबर २२ या कालावधीत गुवाहाटी येथे पार पडली. यास्पर्धेत ईशा नेगीने हिने २० वर्षांखालील महिलांमध्ये ४०० मीटर अडथळा शर्यतीत मोठ्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीसह रौप्य पदक मिळवले. तर १४ वर्षाखालील मुलींच्या ट्रायथलॉनमध्ये मिहिका सुर्वे हिने टॉप ६ मध्ये स्थान मिळवू शकली. त्याचबरोबर निखिल ढाके याने खूप छान एक्स्पोज केले होते. हे खेळाडू ठाण्याच्या दादोजी कोंडदेव स्टेडियमवर प्रशिक्षण घेत आहे.

*ईशा खूप मेहनती मुलगी आहे. गेल्या वेळी राष्ट्रीय स्पर्धेतही ती पदक जिंकण्याच्या अगदी जवळ होती. यावेळी ईशाने प्लॅन उत्तम प्रकारे अंमलात आणला. वैयक्तिक सर्वोत्तम करणे हे माझे ध्येय आहे आणि तिने दोन्ही शर्यतींमध्ये तेच केले. मिहिका आणि निखिल यांना पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी थोडे अधिक काम करावे लागेल.*

*– निलेश पाटकर,* प्रशिक्षक

*माझी राष्ट्रीय स्तरावर ४०० मीटर एरा हर्डलच्या अंतिम फेरीत पोहोचण्याची ही दुसरी वेळ आहे. मागच्या वेळी मला हवं तसं परफॉर्म करता आलं नाही, पण यावेळी मला ते चुकवायचं नव्हतं. माझ्या प्रशिक्षकाच्या उपस्थितीने माझ्या कामगिरीत मोठा फरक पडला. मी प्राथमिक फेरीत आणि अंतिम फेरीत वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी करू शकली म्हणून मी आनंदी आहे. मला माझ्या पालकांचे आभार मानायला हवे ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला की मी हे करू शकतो.*

*– ईशा नेगी*

# राज्यस्तरीय खो खो स्पर्धेसाठी प्रणय कमले यांची प्रशिक्षकपदी निवड

**ठाणे:** ठाण्यातील मावळी मंडळ ही शालेय क्रीडा स्पर्धांसाठी अग्रमानांकित संस्था असून या संस्थेतील क्रीडा प्रशिक्षक प्रणय कमले यांची अलिबाग येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कुमार व कुमारी या गटाच्या स्पर्धे करिता श्री मावळी मंडळचे खो खो संघाचे ठाणे जिल्हा कुमार गटाच्या प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे. दरम्यान, अलिबाग येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कुमार गटाच्या स्पर्धेकरिता श्री मावळी मंडळच्या कुमार संघातील शुभम प्रमोद जाधव आणि तनिष गणेश फाटे ह्या दोन खेळाडूंचे ठाणे जिल्हा कुमार गटाच्या संघात निवड झाली आहे.

# ठाण्यात देहविक्री व्यवसाय चालविणारी महिला दलाल जेरबंद

## दोन अल्पवयीन मुलींसह महिलेची सुटका

**ठाणे:** देहविक्रीच्या व्यवसायात अल्पवयीन मुलींसह महिलेला ओढून देहव्यापाराचा रॅकेट चालविणाऱ्या एका महिला एजंटला ठाणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने कोपरित बनावट ग्राहक पाठवून त्याच्या भांडफोड केली. तसेच त्या महिला एजंटला जेरबंद करत, तिच्या तावडीतून दोन अल्पवयीन मुली व एक पिडीत महीलेची सुटका करण्यात ठाणे शहर पोलिसांना यश आले आहे.ठाणे शहर परिसरात तसेच अश्या वेगवेगळ्या ठिकाणी काही महिन्यांपासून पिडीत असहाय्य महिलांना फुस लावुन वेश्यागमनासाठी काही महीला दलाल पिडीत महीलांना पाठवितात. ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस पथकास हया देहव्यापार रॅकेटची माहिती मिळताच त्या पोलीस पथकाने कोपरी कॉलनी येथे छापा टाकत हा रॅकेट उध्वस्त केला आहे. ही कारवाई ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या पथकाने १६ नोव्हेंबरला त्या दलाल महिले विरुध्द कोपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोपरी पोलीस पुढील तपास करत आहेत.

# ठाण्यात कॉंग्रेस पुरस्कृत राज्यस्तरीय कॅरम स्पर्धा

**ठाणे:** ठाण्यातील कॅरम क्षेत्रातील अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या शक्ती कॅरम क्लब व ठाणे शहर काँग्रेसच्या वतीने काँग्रेस नेते सचिन शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १९ व २० नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय भव्य कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत राज्यातील तसेच ठाण्यातील नावाजलेले कॅरमपटू सहभागी होणार असल्याची माहीती शक्ती कॅरम क्लबच्या वतीने देण्यात आली आहे. ही स्पर्धा महिला व पुरुष या दोन गटात होणार असून पुरुष गटासाठी दहा हजार रोख व स्मृतिचिन्ह द्वितीय पारितोषिक सात हजार रोख व स्मृतिचिन्ह अशा प्रकारे विविध १६ पारितोषिके देण्यात येणार आहेत महिलांसाठीही विविध रोख रकमेसह पारितोषिके देण्यात येणार असून या स्पर्धेत जागतीक कॅरम स्पर्धेतील विजेता संदिप दिवे,आंतराष्ट्रीय दुहेरी कॅरम विजेता निरंजन निमकर आदिसह कॅरम क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असून पंचप्रमुख म्हणून प्रणेश पवार हे स्पर्धेचे निरिक्षण करणार आहेत ठाण्यातील महागिरी कोळीवाडा येथील एकविरा मित्र मंडळाच्या सभागृहात या स्पर्धा पार पडणार असून सहभागी होण्याकरिता (९९३०८५९०७०/९८९२९१९०७२)या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन या स्पर्धेचे निमंत्रक व ठाणे शहर काँग्रेस सरचिटणीस व मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे यांनी केले आहे.

# ६ वर्षापूर्वी बांधलेले आरोग्य केंद्र उद्घाटन विना बनले खंडर



## दिवा रेल्वे स्टेशनवर नव्याने आरोग्य केंद्राची (ईएमआर) तात्काळ उभारणी करण्याची मागणी

### मध्य रेल्वे डीआरएम यांना निवेदन

**ठाणे : दिवा रेल्वे स्थानक येथे आरोग्य केंद्र (ईएमआर) ची सहा वर्षापूर्वी उभारणी करण्यात आली होती. परंतु स्टेशन पासून हे आरोग्य केंद्र लांब असल्याने कुणीही डॉक्टर या ठिकाणी येत नसल्याने आरोग्य केंद्राची उद्घाटन विना दुरावस्था झाली असल्याने दिवा स्टेशन पश्चिम बाजूला तिकीट खिडकी समोर जागेवर्ती नव्याने आरोग्य केंद्र रेल्वेने उभारावे,अशी मागणी सेंट्रल रेल्वे ठाणे स्टेशन सल्लागार सदस्य अमोल कदम यांनी मध्य रेल्वेचे डीआरएम रजनीश गोयल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

मध्य रेल्वे मार्गावरील दिवा रेल्वे स्थानक येथून लोकल, पॅसेंजर तसेच मेल एक्सप्रेसने लाखो प्रवासी या रेल्वे स्थानकातून प्रवास करत आहेत. प्रवास करत असताना प्रवाशाला काही दुखापत झाली तर त्याला खाजगी रुग्णालय किंवा थेट दिव्यातून ठाणे सिव्हील रुग्णालय किंवा कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय या ठिकाणी उपचाराकरिता जावे लागते. रेल्वेने सर्व रेल्वे स्थानक आरोग्य केंद्र, ई एम.आर उभारले आहेत.

दिवा या जंक्शन असलेल्या रेल्वे स्थानक येथे सहा वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या आरोग्य केंद्र सांडपाण्याच्या मोठ्या नाल्याच्या बाजूला असून भयंकर दुर्गंधी या ठिकाणी पसरत असते. तसेच या आरोग्य केंद्राच्या ठिकाणी रुग्णवाहीकेला जाण्याकरिता पुरेसा रस्ता देखील नसल्यामुळे ते बांधलेली आरोग्य केंद्राच्या इमारतीची अवस्था खंडर अशीच झाल्याने नव्याने आरोग्य केंद्र दिवा रेल्वे स्थानकाच्या पच्छिमेला तिकीट घरा समोर असलेल्या मोकळ्या जागेत तात्काळ नव्याने इमारत बांधून सुरू करुन प्रवाशांना वेळीच उपचार मिळतील याकडे रेल्वे विभागाने विशेष लक्ष द्यावे असे निवेदन मध्य रेल्वेचे डीआरएम रजनीश गोयल, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे तसेच दिवा रेल्वे स्टेशन प्रबंधक मनोज गुप्ता यांना सेंट्रल रेल्वे ठाणे स्टेशन सल्लागार सदस्य कदम यांनी दिले आहे.

# पालिकेच्या अधिकाऱ्यांचेच रस्त्यावर बेकायदेशीर अतिक्रमण

## लोकमान्यनगरमधील कोट्यवधी रूपये खर्च करून बांधलेला काँक्रिट रस्ता नागरिकांसाठी बंदच

### नगर अभियंता यांच्या आशीर्वादाने बेकायदेशीर बांधकाम करणारे अधिकारी मोकाट

**ठाणे :** ठाणे पालिकेच्या नगर अभियंता विभागाला हाताशी धरून रस्ता मंजूर केला, त्यासाठीचा निधीही खर्च केल्याचे दाखविले पण हा कोट्यवधी रूपये खर्च करून बांधलेला काँक्रीटचा रस्ता भिंत बांधून बंदिस्त करत चक्क पालिकेच्या अधिकाऱ्यांनीच बेकायदेशी अतिक्रमण केल्याची घटना उघडकीस आली आहे. हा रस्ता ठाण्यातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या लोकमान्यनगर प्रभाग समितीमधला आहे.

लोकमान्यनगर परिसरातील तरण तलावला लागूनच या रस्त्यावर सुमारे सव्वा कोटी खर्च करण्यात आला.हा रस्ता सेवा रस्तामध्ये येत असून या प्रभाग समितीतील कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी कोट्यवधी खर्च करून हा बांधलेला रस्ता भिंत बांधून बंदिस्त केला असल्याचा आरोप मनसेचे जनहित विधी विभागचे शहर अध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी केला आहे. तसेच या रस्त्याचा उपयोग सामान्य नागरिकांना होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी ठेकेदाराशी संगनमत करून रस्त्यासाठी आरक्षित असलेल्या जागेवरच भिंत बांधून रस्ता पूर्णपणे बंद केल्याचे दिसून येत आहे. दरम्यान या प्रश्री नगरअभियंता यांना वारंवार निवेदन देऊन हा प्रकार निदर्शनास आणून दिल्यानंतरही हे काम आम्हाला माहित असून या जागेची ठाणे पालिका मालक आहे, त्यामुळे त्या जागेवर काही करू शकतो अशी उत्तरं देत हा प्रकार दाबण्याचा प्रयत्न करत असल्याचे महिंद्रकर यांनी सांगितले.

विशेष म्हणजे या बांधलेल्या भिंतीबाबत महापालकेच्या कोणत्याही दस्ताऐवजवर नोंद नसून कोणतीही निविदा नसताना ठेकेदाराकडून बेकायदेशीररित्या बांधलेली असल्याचे समोर आले आहे. पालिकेचे अधिकारीच पदाचा गैरवापर करत सेवा रस्त्यावर बेकायदेशीर अतिक्रमण करत असतील तर सर्वसामान्य नागरिकांनी हक्कासाठी कोणाचे दरवाजे ठोठवायचे असा प्रश्न ठाणेकरांना पडला आहे.

> *पालिकेचे अधिकारी बेकायदेशीर अतिक्रमण करत असल्याचा प्रकार धक्कादायक असून पालिका आयुक्तांनी याप्रश्री चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांना त्वरीत निलंबित करावे व ठेकेदारावर गुन्हा दाखल करावा. तसेच हा रस्ता सर्वसामान्य नागरिकांसाठी बांधला असून तो त्यांच्यासाठी खुला करावा. अन्यथा मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल.*
>
> *– स्वप्नील महिंद्रकर, ठाणे शहर अध्यक्ष, जनहित व विधी विभाग मनसे*

# तालुका स्तरावर विशेष सातबारा शिबीर

## जमिनीच्या फेरफार नोंदी आता संगणकीकृत

**ठाणे:** ठाणे जिल्ह्यातील जमिनीच्या फेरफार नोंदी आता संगणकीकृत होत असून या ई-फेरफार नोंदीनुसार जिल्ह्यातील नागरिकांना अचूक सातबारा उतारा देण्यासाठी येत्या २२ किंवा २३ नोव्हेंबर रोजी तालुकास्तरावर विशेष शिबिर कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहे.

डिजिटल इंडिया भूमीअभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमाअंतर्गत (ऊखडठचझ) ठाणे जिल्ह्यात ई–फेरफार नोंदीचे काम सुरू आहे. ई–फेरफार प्रणालीमुळे जनतेला अचूक ऑनलाईन सातबारा व आठ अ उतारा मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाकडून सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा दरम्यान फेरफार नोंदींचे काम पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले होते. त्यानुसार ५ नोव्हेंबर २०२२ पर्यंत या नोंदींचा निपटारा करण्याच्या सूचना महसूल प्रशासनाला देण्यात आल्या होत्या. या करीता ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुकास्तरावर २२ किंवा २३ नोव्हेंबर रोजी विशेष कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश सर्व तहसीलदार यांना देण्यात आले आहेत. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपजिल्हाधिकारी यांची तालुकानिहाय समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

या मोहिमेत नागरिकांना अचूक नोंदी असलेला ऑनलाईन गाव नमुना नं. सातबारा उतारा मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या जमिनींच्या नोंदीची अद्ययावत माहिती मिळणार आहे. यासाठी अधिकाधिक नागरिकांनी तालुका स्तरावरील शिबीर कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी त्यामध्ये सहभागी होणेबाबत जिल्हाधिकारी शिनगारे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना जाहीर आवाहन केले आहे.